| | | |
|---|---|---|
| | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | |

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ 8129 /२०२३ दिनांक :-09 /११/२०२३

प्रसिध्दीपत्रक

**विषय :- दिवाळी सणाचे निमित्त शहराचे मध्यवर्ती भागात खरेदीकरीता येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांकरीता पार्किंग सुविधा**

-------oo--------

पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील बाजारपेठांमध्ये दिवाळी सणाचे निमित्ताने खरेदी करीता ग्राहकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. खरेदीकरीता येणारे नागरिक आपली वाहने रस्त्यातच पार्क करीत असल्याने मध्यवर्ती भागात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. शहराचे मध्यवर्ती भागात खरेदीकरीता येणाऱ्या नागरिकांची वाहने पार्किंगचे ठिकाणीच पार्क झाल्यास मध्यवर्ती भागातील वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होईल. याकरीता दिपावली निमीत्त शहराचे मध्यवर्ती भागामध्ये येणाऱ्या नागरिकांचे वाहनांचे पार्किंगकरीता **दि. १०/११/२०२३ ते ११/११/२०२३ रोजी** खालीलप्रमाणे पार्किंग सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

❖ **चारचाकी वाहनांकरीता**

१) नदिपात्र (भिडे पुल ते जयवंतराव टिळक पुल )
२) हमालवाडा व भानुवीलास या ठिकाणी सशुल्क पार्किंग
३) नु.म.वि. शाळा मैदान (सेवासदन चौक ते अप्पा बळवंत चौक दरम्यान)

❖ **दुचाकी वाहनांकरीता**

१) भिडे पुलाजवळ नदिपात्र
२) संताजी घोरपडे पथ (कुंभारवेस चौक ते गाडगीळ पुतळा चौक दरम्यान)

तरी शहरातील मध्यवर्ती भागात येणाऱ्या नागरिकांनी वाहतूक कोंडी टाळणेकरीता आपली वाहने वर नमुद पार्किंगचे ठिकाणीच पार्क करुन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात येत आहे.

9/11/2023

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबधितांना.**